॥ श्री गुरुदेव प्रसन्न ॥

ॐ

# लहरी ज्ञानदीप

# भजनमाला

## मराठी, हिन्दी

रचियता

संत श्री जैरामदास उर्फ लहरीबाबा

कामठा

किमत ६-०० रुपये

॥ श्री गुरुदेव प्रसन्न ॥

ॐ

# लहरी–ज्ञानदीप

## भजनमाला

### मराठी, हिन्दी

( जुनी आवृत्ती वरून )

卐

रचियता

संत जैरामदास उर्फ लहरीबाबा

कामठा

किंमत ६-०० रुपये

प्रकाशक :

**संत श्री जैरामदास उर्फ लहरी बाबा**

प्रबंधक, लहरी आश्रम कामठा.

त. गोंदिया जि. भंडारा (महाराष्ट्र)

पुस्तक मिळण्याचे ठिकाण :

**श्री लहरी आश्रम कामठा**

त. गोंदिया जि. भंडारा

जुनी आवृत्ती वरून पुर्न मुद्रित २००० प्रति

दिनांक ३० नोव्हेंबर १९९८

सर्वाधिकार प्रकाशकाचे स्वाधीन.

किंमत ६-०० रूपये

मुद्रक :

**नव दुर्गा प्रिंटींग प्रेस**

राम मंदीर वार्ड, भंडारा-४४१९०४

फोन नं. ५७४३०

# दोन शब्द

पाहुनी जग भुलले भौतिक वादात ।
म्हणून कासाविस जीव झाला ।।
विनवितो पांडुरंगा, उचल देवा पड़दा जड ज्ञानाचा ।
दे प्रकाश अध्यात्माचा ।।

आजचे जग हे भौतिकवादात अगदी गुंतून गेलेले आहे. एकमेकावर विजय मिळविण्याची ईर्ष्या वाढली आहे. एकमेकांना पराजीत करण्यासाठी घृणात्मक कृत्य आणि शस्त्रांचा प्रयोग आणि उपयोग होत आहे. परंतु हृया पासून जगांत अशांतिच वाढत आहे. व सर्व विश्वातील मानव जातच भयानक शकेत पछाड-लेली आहे. क्षणिक सुख, मोहमाया अहंकार, यांच्या पाशात अडकून माणसाला माणुसकीचा विसर पड़त चालला आहे. आकस्मिक घटना अलपायुष्य व यमयातना देणारे आज़ार हृयांचा पदोपदी अनुभव येत असूनही तो परमेश्वराचे अस्तित्व माना-वयास व त्याच्या चरणी लीन होण्यास तयार नाही. आणि स्वत:च स्वत:साठी दु:खाचे डोंगर रचित आहे.

जगांत सुख शांति व रामराज्याचा अनुभव घ्यावयाचा असेल तर, आध्यात्मिक ज्ञानाशिवाय तरणोपाय नाही. हृया-शिवाय कोणतीही शक्ति, कोणतेही शस्त्र परिणामकारक ठरणार नाही. भारत हा आध्यात्मवादाची गुरुकिल्ली आहे. तर भारतीयच हृया ज्ञानापासून दूर जात आहेत

येथील महात्म्यांनीच, गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध व निरनिराळ्या रचना जनतेला सन्मार्गात आणण्या करिता केलेल्या आहेत. म्हणून त्यांच्या वचना प्रमाणें, चालणें आमचे तरी मुख्य कर्तव्य आहे. मी ही सरळ भाषेत काही भजने, त्याच उद्देश्यानी तयार केलेली आहेत. भजनांचे गायन करून त्याचा अर्थ आत्मसात करून घ्यावा म्हणजे मी कृतज्ञ झालो.

**- जैरामदास**

# - अनुक्रमणिका -


| अ. नं | विभाग-मराठी | पृष्ठ नं. |
|---|---|---|
| १ | त्याग तंबाखु, गांजा, चुट्टा | १ |
| २ | वाईट तरी म्हणावे काय कुणाला | २ |
| ३ | व्हारे व्हा जागृत व्हा | २ |
| ४ | जरी सुख मार्ग बघतोसी | ३ |
| ५ | गेली वेळ पुन्हा न मिळेरे | ४ |
| ६ | चहाडी चुकलीत कसा तूं बसला रे | ४ |
| ७ | पांडुरंगा तुजविण मज नाहीं विसावा | ५ |
| ८ | खेळ प्रभु हा, कैसा रचिला | ६ |
| ९ | मित्रा कोण कुणाचे दुःख हरतो | ६ |
| १० | पतिव्रता नेम, मनी हा धरावे | ७ |
| ११ | आम्हा सोडूनि गेले कुठे यदुराया | ८ |
| १२ | तुजविण चैन ना या बावऱ्या मना | ९ |
| १३ | काम नाहीं, राम नाहीं | ९ |
| १४ | पाहुनीया दुःखी जीवा | १० |
| १५ | गड्या तूं ऐक हे म्हणणं | १० |
| १६ | स्वस्थ कसे बनले हो गावकरी | ११ |
| १७ | देवा कसा येऊ तुझ्या मंदिरीं | १२ |
| १८ | ऐक पार्वती नंदना (पोवाडा) | १२ |
| १९ | तुम्ही ऐका हो मानवा ,, | १३ |
| २० | नर जन्म ही संधी ,, | १५ |
| | **विभाग-हिन्दी** | |
| २१ | बारम्बार विनय करुं भगवन | १६ |
| २२ | कबहूं सुधरेगी समाजवा | १७ |
| २३ | धन्य सतगुरुनाथ | १८ |
| २४ | भूले मत धन दौलत सपना | १९ |
| २५ | प्यारे सुंदर जीवन को | २० |
| २६ | अभंग व ओवी ( मराठी ) | २१ ते ३६ |

# संत श्री जैरामदास उर्फ लहरीबाबा
## कामठा



आश्रम- कामठा त. गोंदिया जि. भंडारा (महाराष्ट्र)

जन्म तारीख- ७।१२।१९२२

# लहरी-ज्ञानदीप

## भजनमाला

### भजन १ (चाल : उड़े जब जब जुलफे तेरी)

त्याग तंबाखु, गांजा, गुटका, रक्ताचा होतो तोटा ।
भल्या भल्याशी लागला बट्टा ।
अरे तूं ऐक जरा, अरे तूं ऐक जरा हे सखिया ।।टेक।।

रोगानें स्वारी केली, त्याने स्वप्नी धातु गेली ।
औषधाची पाळी आली ।
लागला व्यसन खोटा ।।१।।

कफ चैन पडूं न देईना, मन क्षणमात्र न राहिना ।
कधी नाम मुखी तुज येईना ।
लागला तुजला बट्टा ।।२।।

आता सेवूं नको तूं याला, नाही निघत यांनी रे भला ।
सांगे जैराम समजावूनी तुजला ।
जन करतील थट्टा ।।३।।

**भजन २ (चाल : भैया मेरे राखींके)**

वाईट तरी म्हणावे काय कुणाला ।
बघा शोधून आपुल्याच हृदयाला ।
माझा मीच पाहे जनाला जनाला ।।टेक।।

खोटया या अज्ञानापायी । इंद्रियांशी मन ओढून नेई ।
भुलवुनी ताब्यात अपुल्या घेई । ज्ञान अज्ञानी भ्रांती होई ।
सांगू किती या मनाला मनाला ।।१।।

षडविकारें दावुनी जोर । जाऊ देती हे समोर ।
वालना ओढी अष्ट प्रहर । सत्य असत्याचा न मिळे सार ।
भ्रष्ट करी या बुद्धीला बुद्धीला ।।२।।

कर्म अकर्म या देहाशी । साक्षीं पाही तो अविनाशी ।
कर्माचे फळ देई त्याशी । पुण्य पाप हे बंध घालिती ।
भक्तीविण तरणे कुणाला कुणाला ।।३।।

दया शांती हृदयी धरावी । तनु त्यागिता किर्ती उरावी ।
सत्याचे आचरण करावे । जैराम म्हणे मनी विचार धरावे ।
बघावे आपण आपणाला आपणाला ।।४।।

**भजन ३ (चाल : यारे या गरिबांनो या करू खेड्याची सुधारणा)**

व्हारे व्हां जागृत व्हा, मुखी रामनाम घ्या ।
तेव्हा जीवाला कांही तरी सुख हो ।।टेक।।

अंगी भरले विकार, त्यांनी होतां बेजार ।
यासीं काढण्याचें शस्त्र हातीं धरा हो ।
काढा अवगुण मळ, व्हारे सर्व निर्मळ ।
देव दर्शन तेव्हा तुम्हा देई हो ।।१।।

करा सत् व्यवहार, नाही खोड्यांत सार।
याच मार्गानें वाट पुढे जाई हो।
प्रेम भावाने वाग, उदय होतील भाग।
आली संधी ही खोवूं नका हो ॥२॥

कांही परोपकार व्हावा, ऐसा मार्ग आवळावा।
देह गेल्यावर किर्ती मग राही हो।
म्हणे जैरामदास, वेळ करूं नका नाश हो।
नाही तर पुढे यमा पाश हो ॥३॥

भजन ४ ( चाल : निघू दे दिवस मंगल तो– )

जरी सुख मार्ग बघतोसी, हरिनामा घे तू आधार।
विषय नादीं कां भुलतोसी भले तुज यांत न होणार ॥टेक॥

मोहनी घातली मायेने बांधिले अपुले फाशांत।
दिसे दृष्टीपुढे सर्व क्षणिक हा सार संसार ॥१॥

ऋषी मुनी राजे नी योगी आले हे जन्म घेवोनि।
राहिले ना इथे कोणी काळाने केले त्यांना ठार ॥२॥

लई जमवूनि ठेविले राजपट द्रव्ये गज घोड़े।
साथ ना देती हे सगळे एकटा तूंचि जाणार ॥३॥

मी तूं पण सोडूनी सारा, लाग रे प्रभू भजनास।
तुटेल सर्व भवपाश करी तूं पूर्ण विचार ॥४॥

म्हणे जैराम ऐकुनि घे, मिळाली संधी मोलाची।
साध रे साध आताची, उभा आहे पुढे काळ ॥५॥

### भजन ५ (चाल : तेरी प्यारी प्यारी सूरत पे)

गली वेळ पुन्हा न मिळेरे, सावध हो मानवा
ही संधी खोवू नका ।
क्षणोक्षणी विचार करी रे, जागृत हो मानवा
ही संधीं खोवू नका ।
कर्म तुझे जे करीत जा । सुख दु:खालाहीं सहितजा ।
नीती धर्मासी पाहुनिया, मन हरी भजनी लावित जा ।
निर्भयतेने कार्य करि रे, जागृत हो मानवा ॥१॥

किती दिवस मागे गेले, त्यावरी तूने ध्यान न दिले ।
माझे माझे म्हणूनिया, सारे दिवस गमाविले ।
उरली वेळ हो साधूनि घेरे, जागृत हो मानवा ॥२॥

अज्ञानामध्ये राहूं नको, द्वेष भाव हा ठेवूं नको ।
समदृष्टीचा मार्ग धरीरे, दुजा कुणाशी मानूं नको ।
किर्ती अमर तू ठेवूनी जारे, जागृत हो मानवा ॥३॥

जन्म लाभला प्रभू दर्शनास, अमोल वेळ ही करू नको नाश ।
जैरामदास म्हणे साधी रे, पुढे नाही अवकाश तुला ।
सोड सोड विषयाचीं मौजे, जागृत हो मानवा ॥४॥

### भजन ६ (चाल : दारू पिण्याला कशाला)

चहाडी चुगलीत कसा तू बसला रे, काम कराया कशाला रूसला ।
घरी मूल बाळ राही उपवासी । त्यांची दैना नये येई ।
वाईट संगती जाऊन फसला रे ॥१॥

नकळे काम तुला करणे । लागली किती रे वाइट व्यसने ।
यानेच कंगाल बनला रे ॥२॥

होती वडीलांची इस्टेट काही । विकूनी तिला दारूच्या पायी ।
धन द्रव्याच्या पायी मूकला रे ॥३॥

धरली मूर्खाची संगती । त्याने भ्रष्ट झाली रे मती ।
दीन दुबळयांना फसवूनी लुटले रे ॥४॥

तरूण दिसतो बघण्यात । आळसाने केली मात ।
स्वर्ण संधी तू वेळ गमाविली रे ॥५॥

गर्वाने थाटून डोलांत राही । द्वेष भावाने सर्वांश पाही ।
प्रेम भावाचा मार्ग हा चुकला रे ॥६॥

जैराम म्हणे सोड ही चाल । हे आहे रे दुःख मूल ।
सत्य वाटेने सुख होई जिवाला रे ॥७॥

**भजन** ७ (चाल : कैद में है बुलबुल)

पांडरंगा तुजविण मज नाही विसावा,
हीन दीन दास मी चरणीं दे ठावा ॥ टेक ॥

कुठवरि माझा अंत पहासी । चैन नाही देवा माझ्या मनाशी ।
जिकडे पहावे तिकडे दुःखराशी । फिरतो वेडयासम मी चहुदिशीं ।
शक्ति हीन भक्ति हीन मति मंद देवा ॥ १ ॥

हे काम क्रोध पाठीशी लागले । दिनरात असती चिन्तीं बसले ।
सत्य वचनां जस थंडा पाडिलें । आयुष्यहि सर्व गमाविले ।
काय करूं नासमजे मज बुद्धी दे देवा ॥ २ ॥

कर जोडोनी विनवणी दासाची । चक्रपाणी कानीं तु घेशी ।
कोटयानुकोटी अपराध माझे । क्षमा करावे मज पामराशी ॥
जैरामाशी घडो तुझी जन्मोजन्मी सेवा ॥ ३ ॥

### भजन ८ (चाल : झूमता मौसम मस्त मदीना)

खेळ प्रभु हा, कैसा रचिला, अंत न लागे रे कोणाला।
महिमा तुझी अपरंपार ।टेक॥

धनि किती केले तुहि । धन द्रव्याचे उने नाही।
खानपान मौजा करती । बैसोनिया मंचका वरती ॥१॥
दीन अति तव केले किती। अन्न वस्त्राची ही फजिती ।
राहण्या नाही कांही ठिकाना। तीळ मात्रहि चैन न त्यांना ॥२॥
रोगाने हे कष्टी किती । होतसे त्यांना दु:ख अती।
दु:खी होती आमरण । सांग मला ते कारण ॥३॥
कित्येकांना भक्ति दिली । तुझ्याच नामी ती रमली।
सर्वस्व तुजला अर्पण केले। अंती तेही तुझ्यांत रमले ॥४॥
ऋषीं मुनी ही तुझी महिमा। वर्णिता पार पावे तुम्हा।
पामर जैराम शरणी आला । सांगावे हरी आपण त्याला ॥५॥

### भजन ९ (चाल : गुरु देवाची महिमा न्यारी)

मित्रा कोण कुणाचे दुख हरतो। ज्याचे तोच कर्म फळ भोगतो॥टे.॥
साधुसंत हे मार्ग दर्शविती । जन्म मृत्युच्या विरहित करती।
स्वयं विदेहीं अवस्थेत राहुन। विश्व व्यापक एक रुप बघतो ॥१॥
कर्ता असुनी अकर्ता राही। ऐसी गीता देते ग्वाही।
अविनाशीं साक्षीरूप पाही। कैवल्यांत बासुरी वाजवितो ॥२॥
पाप पुण्य जे करिती प्राणी। वर्म चुकती मुर्ख अडाणी।
भोगती चौऱ्याशी लक्ष योनी। लई भाग्याने मानव देह मिळतो ॥३॥
ज्याचे पदरी पूर्वीचे पुण्य। त्यांना होते आत्मदर्शन।
तेव्हा जग हे करीती वंदन। जैराम म्हणे का अजून भुलतो ॥४॥

**भजन १०** (चाल : बेगाने शादी में)

पतिव्रता नेंम, मनी हा धरावे, पति आज्ञा आई बहिणींनी पाळावे ।।टे.।।

नारदमुनी आले, सावित्रीस कळविले ।
ज्याला तू मनांत वरण्याचे ठरविले ।
वर्षांनंतर मरणार, हे खोटे न होणार वचन, माझे हे सत्य
कधी न टळणार ।।१।।

दिले तिने उत्तर, ऐके मुनीश्वर, मुक्तिची वेळ सांगा ।
लिहुन मी घेणार ।
लग्नकरीन मी खरे, याने होईल बरे, हट्टानें सावित्रीने
लग्न तेव्हांचि केले ।।२।।

च्यार दिवस उरले, अन्न जळ त्यागिले ।
मुक्तिच्या दिवशी तिने पतिशी न सोडिले ।
गेला सत्यवान, सावित्रीला घेऊन, मुर्च्छा आली गेला
झाडावरून उतरून ।।३।।

आले यमराजा, सत्यवानाच्या काजा,
मांडीवर घेऊन त्याने पाहिले सावित्रीस आज ।
प्राण नेंऊ लागला, तिने विचारला, घेऊन चालावे मज म्हणे
यम राजाला ।।४।।

वरदान मागावे, सवे नाही यावे, सर्व कांही देतो मी, तूं ग परतावे ।
तिने वर मागला, राजपाट चांगला, सासू सासऱ्या डोळे, पुत्र
इच्छा आहे मला ।।५।।

यम म्हणे बरे आहे, आस तुझी पूर्ण होय, सत्यवानाशी मज
आता नेऊ देय ।
सावित्री देई उत्तर, पुत्र कैसा होणार, तेव्हा यमराजाने
मानली आपुली हार ॥ ६ ॥

जयरामदास म्हणे, चाले जी नेमाने, जगामाजीं किर्ती राही,
नांव घेती प्रेमाने ।
धन्य तीचे अवतार, सर्वांचा उद्धार, तिन्ही लोकीं सुख होई,
ज्यांचे बलावर ॥ ७ ॥

भजन ११ (चाल : मोरी छम छम बाजे)

आम्हा सोडूनि गेले कुठे यदुराया । कुणी सांगाना हो हे सखिया ।
दर्शनाविण चैन ना ह्या मना, पाहु कुठे तुला मी रानीवना ।
सूचेना या मना, दिपविले नयना ।
झालों मी पिसा बावरिया ॥१॥

तडफडतो हा, जीवकसा बावरा, फिरतो हा जिकडे तिकडे फेरा ।
राही ना एक क्षणी, जातो चहू वनीं ।
केव्हा भेट देशीन् देवराया ॥२॥

अहर्निश असो ही मजला चिंता, मनीं पडली आहे ही भ्रमता ।
कैसा होऊ मी पार, घेऊ कुणाचा आधार ।
कैशी भेट होईल तुझी श्रीराया ॥३॥

देवाविण कैसा होईल उद्धार, जन्म घेऊनिया मिळाला नाही रे सार ।
घेतला संताचा आधार, होण्या भवसिंधू पार ।
दर्शनाविण जैराम, जन्मवाया ॥४॥

## भजन १२ (चाल : एक परदेशी मेरा दिल)

तुजविण चैन ना बावऱ्या मना, दरुशन द्यावे मज राधारमणा ।।टेक।।

सर्वस्व तुजला अर्पण करुनी, तुझिया नामाच्या नादी लागोनी ।
मतिमद दास मी आलो शरणा ।।१।।

शास्त्र पुराण ही वाचन केले, मंदीरांत ध्यान धरिलें ।
दिसला नाही तूं गा मंदिरांत कान्हा ।।२।।

पाहुनी आलों तिर्थस्थानीं, परी न दिसला चक्रपाणी ।
तळमळ लागतसे या नयना ।।३।।

रात्रदिवस लागली चिंता, केव्हा भेट देसी तूं अनंता ।
पडलो मी भ्रांती तुझा अंत कळेना ।।४।।

साधू संगतीत जाऊन बैसलों, आसन मुद्रा मी लाविलो ।
फिरविली माळा परि भ्रम मिटेना ।।५।।

कितीक संतांनी बोध मज केला, परक्या जिवांच्या लाग सेवेला ।
जैराम म्हणे सर्वाठायी पाहिला कान्हा ।।६।।

## भजन १३ (गुजराथ देश गांधी)

काम नाही, राम नाही, व्यर्थ हे जीणें ।
निष्काम बैसोनिया भूमि भार तो देणे ।।टेक।।

प्रेम नेम नाही मार्ग वाईट चालीचा ।
नित्य फिरत राही संगे लुबाडी यांचा ।
जमी येउनिया अपकिर्ती करणे ।।१।।

ज्ञान ध्यान नाही अंगी, बडबड करणें ।
लोकां फसवोनी आपण सूज्ञ म्हणविणें ।
माहीत नाही काळवेळ फुकट जिणे ।।२।।

लक्ष दे आयुष्यावर वेळ खोवूं नको ।
गर्व गुमानामध्ये स्वस्थ बसूं नको ।
वाट घेई सुगम तेव्हां होईल तरणे ॥३॥

लाग आता कामास म्हणे जैरामदास ।
उगीच बैसोनिया। काय पाहतोस ।
जगामधी किर्ती राहील तयाने ॥४॥

**भजन १४ (चाल : दिसतो हरी हा भोळा)**

पाहुनीया दुःखी जीवा, मन कळवळते हें देवा ॥ टेक ॥

चहु दिशी फिरतें मन, विसावा नाही एक क्षण ।
येते कींव माधवा ॥१॥

अन्न वस्त्राने दुःखी जन, फिरती शोकाकुल होऊन ।
गेलो त्रासूनी केशवा ॥२॥

रात्रं दिवस चितातूर, क्षीण झालें याने शरीर ।
मज कांही सूचेना यादवा ॥३॥

कंठ येतो हा भरून, अश्रू गळती डोळयांतून ।
दुर्दशा गरीबाच्या जीवा ॥४॥

जैराम म्हणे कधी भेटशी, तुम्ही यावे रक्षा करण्याशी ।
नम्र बोल कानीं घ्यावा ॥५॥

**भजन १५ (चाल : निघू दे दिवसा मंगल तो)**

गडया तूं ऐक हें म्हणणं, मनाची लालसा सोड ।
सोडुनी खोटी संगती प्रभुचरणीं मना जोड ॥ धृ० ॥

चार दिवसांचे हें जीणें शेवटी येथूनी जाणें।
सोड तूं मी तूं पणाला आणी कुसंगती तोड ॥१॥

हे सारें व्यर्थ हित धरुनि जें कर्म त्यांसी तूं भूलला।
भजन करि नित्य तूं प्रभुचे, प्रित विषयाची तूं मोड ॥२॥

तरुणपण हाचि रे सगळा, स्त्रीपुत्रामाजीं खोविला।
वृद्धपणीं सूचेना कांही, रोगाने रडसी ढळढळा ॥३॥

निघून चालली ही वेळ, सुवर्ण संधिरे जन्माची।
म्हणे जैराम रे मनुजा प्रभुशी एकता जोड ॥४॥

**भजन १६ (चालः असा कसा तारील)**

स्वस्थ कसे बनले हो गावकरी, जागृत व्हा लवकरी लवकरी।
संकट आले देशावर, तनमन धनाने व्हा तैयार।
शत्रूंना हाका दूरी दूरी ॥१॥

एकतेचा मार्ग घेऊनी, आपसांतील फूट काढूनी।
व्हा सर्व देश पुजारी, पुजारी ॥२॥

देशाचा गौरव वाढविण्या, अन्न पिकवा उन्नत होण्या।
सावध व्हा तत्परी, तत्परी ॥३॥

शिक्षण घ्यावें लहान थोरीं, याने होईल अज्ञान दुरी।
तेणे अस्पृश्यता निवारी, निवारी ॥४॥

मातृ भूमीचे ऋण हरण्या, आल्या जन्माचें सार्थक साधण्या।
घ्या काम अपुल्या करि ॥५॥

नीत्ति धर्मासी पाहूणी चाला, जैराम म्हणे होईल भला।
हें घ्यावे सूत्र दोरी ॥६॥

भजन १७ (चाल : असा कसा तारील)

देवा कसा येऊं तुझ्या मंदिरी, पाहण्या ते स्वरुप सुंदरी ॥ धृ ॥

भवसागर हा मोठा कठीण, होऊं देत नाही येण जाण ।
फिरविती हा मज माघारी माघारी ॥ १ ॥

मोह माया ही लागली पाठी, विषयाच्या ह्या नेई घाटी ।
फिरविते ही चहूं फेरी फेरी ॥ २ ॥

हिचे पायी क्षीण झाली काया, स्वर्ण संधी जाते वाया ।
कसे होईल जिवन, उद्धरी उद्धरी ॥३ ॥

चिंता असे ही रात्रंदिवस, कसा तुटेल हा भव पाश ।
आता कृपा करा, मजवरी मजवरी ॥ ४ ॥

जैराम म्हणे अंती ना कोणी, सोडवाया फाशांतूनी ।
मार्ग दावी मज श्रीहरी श्रीहरी ॥ ५ ॥

# पोवाडा

भजन १८ (चाल : मानसा सरळ हो असा)

ऐक पार्वती नंदना, करू वंदना, आलों मी तुझिया चरणाशी ।
लाज तूं ठेव निजभक्ताची ॥ हो राम राम ॥

तूं बुद्धीचा सागर, सरस्वती वर,
ठेविशी ज्याचे शिरीं कर ।
भिकारी होत असे तो थोर ।
त्याला नच कशाचा उणे ।
अशी तुझी लीला अपरंपार ॥१॥ हो राम राम ॥

विघ्न नाशक तुझे ते नांव, पातक हरती सर्व ।
स्मरण करी तुझिया नामाचे ।
तन मन अर्पून साचे ।
तुझ्या रंगांत सदा नाचे ।
तुटतील बंधन यमाचे ॥२॥ हो राम राम

असुरांचा केला संहार, पापी गजासुर,
रक्षा केली तूं भक्तांची ।
मार्ग तूं दाखविला सांची ।
हाक ही ऐकावी आमुची ।
थोरवी तुझिया लीलेची ॥३॥ हो राम राम

किती वर्णूं तुझे ते गुण, गेली जिव्हा थकून,
शेष शारदा आणि ऋषी ।
लागेना अंतच कोणाशी ।
अज्ञानी आलो मी चरणांशी ।
लाज ठेवी जैरामदासाची ॥४॥ हो राम राम

## पोवाडा

**भजन १९** (चाल : मानसा सरळ हो)

तुम्ही ऐका हो मानवा, प्रेम जनीं ठेवा,
एक दुसऱ्याची दया घ्यावी ।
तनू पर उपकारी झिजवावी ।
सर्वांवरी एक दृष्टी ठेवावी ।
ऐसी संधी न गमवावी ॥१॥ हो राम राम

जग आहे क्षणिक बाजार, मुशाफिर घर,
येती कुणी जाती हा व्यवहार ।
लाभली तुला अमोल वेळ ।
अंतरी विचार तूं कर ।
नाहीतर चौऱ्याशीचा फेर ॥२॥ हो राम राम

माया ही भूल पाडणारी, आहे संसारी,
सत्‌नामी भंग करणारीं ।
घाली मोहनी सर्वावरि ।
भुलविते अपुल्याच व्यवहारी ।
हिच्याने कोणी न उद्धरी ॥३॥ हो राम राम

सावध हो चहू दिशा पाहे, काळ उभा आहे,
संधि पाही तो आयुष्याची ।
याचे पासून बरी होण्याची ।
स्मृति तूं धरी हरि नामाची ॥४॥ हो राम राम

पुण्याने नरदेही आला, साधी वेळेला,
संधि नको खोवू या जन्माची ।
आशा नको करूं धन पुत्राची ।
गेली वेळ पुन्हा नये हाती ।
समजुनी जैराम सांगे तुजशी ॥५॥ हो राम राम

# पोवाडा

भजन २० (चाल : मानसा सरळ हो)

नर जन्म ही संधी, लाभली हो उमदी,
पाहूनी वाईट व्यसनांत ।
व्यर्थ वेळ खोवूं नको यांत ॥ हो राम राम ॥

पाप वाढे ज्या अज्ञान, करूं नको सेवन,
संताच्या वचनाशी तू मान ।
सोड गा सर्व दुर्व्यसन ।
जोड सत्न्यायाचे धन ॥१॥ हो राम राम ॥

धर्म केल्याने पुण्य होई, शास्त्राची ग्वाही
पात्र पाहुनी दान देई।
तेव्हा तुज सर्व पुण्य होई ।
नाही तर दान व्यर्थ होई ॥२॥ हो राम राम ॥

तूं ठेवुनी इमानदारी, वाग व्यवहारी ।
अज्ञानाशी सर्व त्याग ।
सत्य नियमानी तूं वाग ।
जैराम म्हणे उदय होईल भाग ॥३॥ हो राम राम ॥

# विभाग-हिन्दी

### भजन २१ (तर्ज : बारबार मैं क्या समझाऊ)

बारम्वार विनय करूं भगवन, करदो नैया पार,
बिच भवरमें अडो हैं नैया हमार ।।धृ०।।

काम क्रोध मद लोभ राहमे थाडे है।
इन दुष्टोंने निशदिन हमको जखडे है।
इनसे बचावो मुझको प्रभुजी, तुमहो प्राण अधार ।।१।।

तेरे बिना कोई न मेरा साथी है।
तूही भगवन मेरी जीवन ज्योती है।
देरी ना करो प्रभुजी अब तुम, दर्शन दो एकबार ।।२।।

तेरे सिवा घनशाम यहाँ कुछ समझेना।
भटक रहा हु इस मायामे कुछ सुझेना।
विनंती मेरी सुनलो प्रभुजी, आया तेरे द्वार ।।३।।

दामाजोकी हुंडो चुकाकर मुक्त किये।
भक्तों के बस में हो सारे काम किये।
हो सागर आप दयाके, तुम भक्तन के हितकार ।।४।।

भक्त प्रल्हाद को तुम संकट से बचाये हो।
खंब फाडकर नाश दुष्टोंका किये हो।
जैरामदास पुकारे तुमको, आवो प्राण अधार ।।५।।

भजन २२ (तर्ज : तोरी बिगडन वा चलनी या)

कबहूँ सुधरेगी समाजवा, पिछरी सारी ।
जाग जाग रे तूं मनुआ लगा न देरी ॥ टेक ॥

अज्ञानता में पड़े हुये है, कितने ये नरनारी ।
धर्मनिति तो छोड दिये है चलते व्यभीचारी ।
कैसी होगी ये तरनवा, भव ये भारी ॥ १ ॥

जो करना था उसे न देखा, राह् बूरी अपनाते ।
झूटे चक्कर में पड़कर प्यारे, खाते यहाँपर गोते ।
कैसी सफल होगी जिवनवा, अग्यान अंधेरी ॥२॥

पल पल घड़ीया निकल रही है, जल अंजली का जैसा ।
क्षणभंगूर है काया इसपर, मत करना भरोसा ।
करले करले तूं भजनवा, उमर थोडी ॥३॥

काल करे सो आजहि करले, धर प्रभू का ध्यान ।
गर्भ करार का विचार करले, कहना संतोंका मान ।
यह गुजर रही उमरीया, लगा न देरी ॥४॥

अमर किर्ती छोडके प्यारे, यहाँ से सभीको जाना ।
यह लोंक दो दिनका मेला, है मुसाफिर खाना ।
मत बने तू दिवान वा, माया जहरी ॥५॥

प्रपंच साधकर सेवाभाव में, अपने मन को लगालो ।
जंरामदास कहे सून प्यारे, तिजोरी पूण्य से भरलो ।
बारम्बार मिले ना समय बा, दर्शन मुरारी ॥६॥

भजन २३ (तर्ज : जारे जारे तूं माखन चोर)

धन्य सतगुरूनाथ, तुम हो जिवन प्रकाश ।
भूलोंके चालक तुम्ही हो प्रभू ॥ टेक ॥

जन्म जन्म के पुण्य है मेरे, दर्शन हुये तुम्हारे ।
अवगूण मेरे हरलो प्रभुजी, शरण आया तुम्हारे ॥१॥

मायाके फंदे मे पडकर भ्रमना पड़ी तुम्हारी ।
बडे ही भाग्य से तुमको पाया, तोडो जन्म की फेरी ॥२॥

डुबती नैयाके तारक तुम हो, नांव लगा दो किनारे ।
अर्ज है मेरी तुमसे गुरूजी, पार करो भवधारे ॥३॥

अंधकार मे तुम उजियारा, होवे जनम छुटकारा ।
कितनी गावूं महिमा तिहारी, लगे ना अंत अधारा ॥४॥

प्यास की प्यास तुम्ही हो भगवन, अन्धो के रखवारे ।
तुम्हरे बिना निराश है हम हो, नैनोकीज्योती हमारे ॥५॥

मानव तन लेके भूपर आये, दु:खियोंको राह बताने ।
जैराम कहे ऐसी राह बतावो, तनमन सेवा करने ॥६॥

## भजन २४ (तर्ज : उड जब जुलपे तेरी)

भूले मत धन दौलत सपना, यह साथ न देगा अपना
जरा तूं सून तो ले
जरा तूं सून तो ले मेरे भैया ॥ धृ० ॥

जिसे कहता हैं तूं अपना ।
यह पल घडी का है सपना ।
क्यों इसमें बनता दिवाना
जरा तूं सोचले ॥१॥

जो देखता है नजरोंसे ।
वह सभि कुछ है नासे ।
क्यों सोया है तूं निंदसे
बिचार मनमें करले ॥२॥

संगी नही किसिका कोई ।
है स्वार्थ के रिस्ते भाई ।
यह मायाने भरमाई
इसमें मत भूले ॥३॥

कोई शत्रू नही है किसका ।
फल मिलता है कर्मोंका ।
मायासे पाता धोखा
कहे जैराम साधले ॥४॥

## भजन २५ (तर्ज : तेरी प्यारी प्यारी)

प्यारे इस सुंदर जीवन को मुफ्त में गमाना नही
जरा तूं सून।
बड़े भाग्य से पाया नरतन ये, इसे बेकार खोना नही
जरा तूं सून ॥टेक॥

औसर मिला प्रभू दर्शनका, समय ऐसा न फिर आनेका।
जाग जाग तूं मेरे भाई, वक्त नही है खोनेका।
चल उठ प्रभु ध्यान लगाले, होगा तेरा उद्धार
जरा तूं सून ॥१॥

कई संत मुनी यहाँ आकरके, तन मन सेवा अर्पण करके।
द्वेष भाव हटाकर सबका, मार्ग सच्चा बताकरके।
छोड गये वो नाम अमर, निति वही सिखले।
जरा तूं सून ॥२॥

देख शत्रू तेरे पासमें है, आयुष्य वक्त भरमाने मे है।
करते तुजपर सदा ही दंगा, भूलता है तूं उनके रंगमे।
धोखा पायेगा इस संगतसे, हुशार होजा अभी
जरा तूं सून ॥३॥

कहे जैराम समजले भाई, करले जिवन उद्धार कमाई।
पार होगी तब भवर से नैया, बिना भजन भलाई नही।
करते जा तूं नेक काम, तब प्रभु होंगे सहाई
जरा तूं सून ॥४॥

## अभंग १

नमन माझे गणपती नाथा । तुझे चरणी राहो माथा ॥१॥
तूचि बुद्धीचा सागर । कृपा ठेवी दासावर ॥२॥
विघ्न नाशक नाम तुझे । हरती पातकांचे ओझे ॥३॥
अगी सद्‌गुण द्यावे । तुझ्या रंगात राहावे ॥४॥
मनी सुमति नित्य राहो । कुमति माझी नष्ट होवो ॥५॥
येननी हृदयीं संचरा । हेंचि मागणे ईश्वरा ॥६॥
अडली नाव मध्यधारीं । बापा येउनि सांभाळ करी ॥७॥
देवा हेचि मागणे तुला । दर्शनाची आस मला ॥८॥
जैराम म्हणे गजानना । पूर्ण करी मन कामना ॥९॥

## अभंग २

देवा तुजशीं मागेन । अहर्निशी तुझे ध्यान ॥१॥
तुझ्या नामाचा महिमा । सदा येवो माझ्या कामा ॥२॥
मुखीं नाम हाती काम । हेचि मज देई दान ॥३॥
ऐसा राहो निजध्यास । कुमतीचा होवो नाश ॥४॥
प्राण जावो अथवा राहो । संत चरणी दृढभाव ॥५॥
दीनानाथा हे मागणें । पामराशी पदरी घेणे ॥६॥
जैरामदासाची ही आस । पूर्ण करी माझी कास ॥७॥

## अभंग ३

नीति नियमाविण जिणे हे संसारी असे पशुपरी आईबापा ॥१॥
जन्मा येउनिया न केले सार्थक । केला अवघात आयुष्याचा ॥२॥
पूर्वीच्या पुण्याने जन्म लाभला । वर्म तो भूलला येउनिया ॥३॥
वाईट संगती कर्म विसरला । दोष तो लाविला प्रारब्धास ॥४॥

आपला आपण बंदीवान झाला । चुकला कर्माला मानवाच्या ॥५॥
जैरामदास म्हणे ओळख तुम्ही करा । पाय ते गा धरा सद्गुरुचे ॥६॥

## अभंग ४

संसारीं येउनी भ्रांतींत पडले । नाम विसरले संगती पायीं ॥१॥
ज्याने जैसे केलें अन्न जें ग्रहण । आले तैसे गुण त्याचे अंगी ॥२॥
लावियेली ज्याला जैसी संगत । तैसे मनोरथ झाले त्याचे ॥३॥
चोराच्या संगतीं चोरच बनले । आयुष्य खोविलें मोलाचें हें ॥४॥
संत संगतीने संत तोचि झाला । पार तेव्हा झाला भवसिंधू ॥५॥
जैरामदास म्हणे कराहो विचार । गुरुविण सार कळत नाही ॥६॥

## अभंग ५

प्रपंचाचे ड़ोहीं दुःख वाटे जिवा । नीति नेमाविणा जिणें व्यर्थ ॥१॥
प्रपंच नियम कराहो सज्जन । बोलावें वचन सत्य सदा ॥२॥
प्राण जावो तरी राहो सत्यवाणी । राहावे नियमांनी नरनारी ॥३॥
आई बहिणींनो मासिकाची पाळी । चार दिवस वेगळी पांचवे शुद्ध ॥४॥
हिंसेलाहि नित्य त्यागुनी राहावें । प्रभु ध्यानीं लागावे अर्हनिशी ॥५॥
सर्वांत उत्तम अहिंसा हा धर्म । हृदयीं धरा नेम रात्रंदिनी ॥६॥
जैरामदास म्हणे संताचें वचन । प्रपंच बंधन तोडावया ॥७॥

## अभंग ६

पहा लबाडाचे गुण । दीन गरिबांशी लुटून ॥१॥
पैशापायीं देव विसरला । कुमार्गांत असे रमला ॥२॥
करी व्यवहार लबाडीचा । बोले बोल पाखंडीचा ॥३॥
भोळ्या लोका नित्य फसवी । धन द्रव्याने भरी पिशवी ॥४॥
वेदशास्त्र अभ्यासिले । बोले तैसा कधी न चाले ॥५॥

बोल निघे तो प्रेमळ। अंतरीं कपटाचा मळ ॥६॥
दया नाही तीळभर। म्हणे आत्मज्ञानी थोर ॥७॥
ज्याचे अंगीं ऐसे गुण। त्यासी वदावें दुरून ॥८॥
नियम ऐसे सर्व त्यागा। त्वरें सत्यमार्गी लागा ॥९॥
पैसा मिळवा प्रपंचा पुरता। मार्ग लाभेल परमार्थाचा ॥१०॥
तनू त्यागूनि कीर्ति ठेवा। तिन्ही लोकीं सुखी बनवा ॥११॥
मागणी हीच देवा मागा। लोभ अहंकाराशी त्यागा ॥१२॥
जैराम म्हणे आईबापा। मार्ग धरा हाचि सोपा ॥१३॥

## अभंग ७

संत जागविती सत्य मार्गी लागा। सन्मार्गासी कां गा चुकता तुम्ही ।१।
सावधान व्हावें सर्वहि सज्जन। करा नामस्मरण एक चित्तें ॥२॥
नीति पाळुनिया कर्म करू लागा। ऐसे संत जगा जागविती ॥३॥
सकळ इंद्रियाचा करूनिया गोळा। भजावे गोपाळा अहर्निश ॥४॥
एक तत्व मन एक तत्व ध्यान। एक तत्व साधन सर्व साधे ॥५॥
ऐसियावे परि मन हातीं येते। जाहले सांगते संतजन ॥६॥
पंचतत्व त्रिगुण एक मेळा केला। स्वरूपीं देखिला विठ्ठल रूपा ॥७॥
तन मन ध्यान साधन जो साधी। संसार उपाधी चुके त्याची ॥८॥
एक तत्व साधुनी सर्वस्व साधिला। जीवन्मुक्त झाला जैराम म्हणे ।९।

## अभंग ८

देवा मागणें तुजपाशी। ध्यान राहो अहर्निशी ॥१॥
तुझ्या नामाचा महिमा। सदा येवो माझ्या कामा ॥२॥
मुखीं नाम हातीं काम। हेचि माझें मोक्ष धाम ॥३॥
ऐसा राहो निजध्यास। कुमतीचा होवो नाश ॥४॥
जैराम म्हणे गा विठ्ठला। सेवा मार्ग द्यावा मला ॥५॥

## अभंग ९

आईबापा तुम्ही करा ओळखण । दुर्व्यसन बंधन तोडा वेगीं ॥१॥
माय पोटीं जेव्हा जन्म आम्हा झाला। दूध हें व्यसन होते तेव्हा ॥२॥
संगतीचे पायों व्यसनीं लागलों । मायेंत भुललों व्यसनापायीं ॥३॥
जैसी जैसी आम्हां संगती मिळाली । तैशी हो घडली सेवा आम्हां ॥४॥
जैसे जैसे अन्न प्राणी करील ग्रहण । तैसे त्यासी गुण देतो हरी ॥५॥
सज्जनांनो तुम्ही तुच्छ व्यसनें सोडा । मन तुम्ही जोडा हरिनामीं ॥६॥
अंत:काळीं तुम्हां अन्न दूध फळ । नाही तीळभर कांही मग ॥७॥
याच नियमें करूनी मन स्थिर झालें। तेणे बा लाभलें हरिनाम ॥८॥
दुर्व्यसन त्यागुनि करील जो साधन । पुन्हा जन्म नाही त्यासी ॥९॥
जैरामदास म्हणे उघडा ज्ञानदृष्टी । तेणे जीवनमुक्ति मिळेल तुम्हां१०।

## अभंग १०

ज्याचें मन स्थिर झालें । त्याने त्रैलोक्य जिंकिलें ॥१॥
ज्याची देवावरी दृष्टी । त्याला वैकुंठाची प्राप्ती ॥२॥
देव ध्यानीं रात्रंदिवस । हरी पाशी त्याचा वास ॥३॥
प्रभु चरणाची जया गोडी । तया भेटतो वनमाळी ॥४॥
जैराम म्हणे गा मानवा । दृढभाव हृदयीं ठेवा ॥५॥

## अभंग ११

माझे आईबापा पंढरीच्या देवा । घडो तुझी सेवा जन्मोजन्मी ॥१॥
विटेवरि उभा राऊळ मंदिरांत । कटेवरी हात ठेवूनिया ॥२॥
कृपा करोनिया नासावी कुमती । सर्वकाळ चित्तीं तुझें ध्यान ॥३॥
जैरामदास म्हणे पंढरीच्या राया । दीनावरी दया असूं द्यावी ॥४॥

## अभंग १२

दु:खी जीवा बघुनि नेत्रीं येते पाणी । म्हणुनि तुझ्या चरणी शरण आलो ॥१॥
मला तुम्ही द्यावे सेवेचें हें काम । सदा मुखीं नाम तूझें देवा ॥२॥
प्रपंच करूनी परमार्थ साधावा । प्रार्थना ही देवा तुजपाशी ॥३॥
तुझें रूप दिसो सदा माझे डोळा । यावे वेळोवेळी तुझें नाम ॥४॥
अनंत जन्माचा फिरलों मी फेरा । मार्ग मज खरा दाखवावा ॥५॥
तुजशी मागणें हेच आहे देवा । संकटीं रक्षावा दीननाथा ॥६॥
जैरामदास म्हणे अगा पांडुरंगा । चौऱ्याशीचा फेरा चुकवी माझा ॥७॥

## अभंग १३

सदा माझें मन राहो तुमचे चरणीं । देवा ही मागणी तुम्हापाशी ॥१॥
मन माझें आहे मोठें हें चंचळ । दाखवी गोंधळ चौऱ्याशींचा ॥२॥
मन हें कपटी व ये तुजपाशीं । फिरतो चौदिशी रानोरान ॥३॥
प्रत्येक वेदांत लिहिलें पुराणीं । मन आवरूनी करा कर्म ॥४॥
जैरामदास म्हणे मागणें श्रीहरी । मन स्थीर करी पांडुरंगा ॥५॥

## अभंग १४

संध्याकाळचा नियम सांगतो तुम्हाबाई । देती ही गवाही वेदशास्त्रें ॥१॥
दिवा लावोनिया प्रभु ध्यान धरा । नमस्कार करा पतिदेवा ॥२॥
पतीची ही सेवा करील जी बाई । तिन्ही लोकीं नाही दु:ख तिला ॥३॥
नीति नियमाने जी बाई चालेल । होईल सफल जन्म तिचा ॥४॥
जैरामदास म्हणे ऐका आईबहिणी । पालन करा तुम्ही हाचि धर्म ॥५॥

## अभंग १५

माझे आईबहिणी सांगतो मी तुम्हा। त्रास मानू नका पतिसेवेचा ।१।
प्रपंच साधून सेवा जी करील । उद्धार होईल तिन्ही कुळाचा ॥२॥
सत्संग घेऊनी व्यवहार करील । काळ तो कापेल थरथरा ॥३॥
सावित्रीने हाचि नियम पाळिला । प्राण वाचविला पतिदेवाचा ।।४।।
याच नियमाने जी बाई वागेल । मोक्षहि मिळेल याच जन्मीं ॥५॥
जैरामदास म्हणे चालावे नियमाने । क्षणोक्षणीं घेणे हरीनाम ।।६।।

## अभंग १६

ऐका मुलाचे लक्षण । आईबापाचा ठेवी मान ॥ १ ॥
दया धर्मांत त्याचें मन । सत्यपणाचे अगीं गुण ॥ २ ॥
दु:खी जनांचे सेवेसाठी । सदा राही त्याची दृष्टी ॥ ३ ॥
आई बापांचे सेवेंत । नित्य राही त्याचें चित्त ॥ ४ ॥
आई बापांची सेवा करी । धन्य धन्य तो संसारी ॥ ५ ॥
साधु संतांचे वचन । सदा करी तो पालन ॥ ६ ॥
जैराम म्हणे धन्य झाला । खरा पुत्र म्हणती त्याला ।।७।।

## अभंग १७

जन्म माझा झाला कुणब्याचे वंशी । काय सांगू तुम्हांशी आईबापा ।।१।।
विसरलो नाम प्रपंचा कारणें । म्हणोनि भोगणें पडे दु:ख ।।२।।
फिरतो मी फेरा प्रपंचाचे पायी । सुख येथे नाही देवाविण ।।३।।
मागणें तुज आहे दीनाच्या दयाळा । संकटी सांभाळा पांडुरंगा ।।४।।
तुझे नामाविण आणिक नये मना । करीतो प्रार्थना नारायणा ।।५।।
प्रपंच उपाधी तोडा गुरुराया । शरण आलों पाया जैराम म्हणे ।।६।।

## अभंग १८

सदा माझें ध्यान तुमचे चरणीं । मन माझे भजनी ठेवी देवा ॥१॥
पहिलें साधन जनलोक सेवा । मागणें हें देवा तुजपाशीं ॥२॥
दुसरा हा वर प्रपंच करुनिया । परमार्थाचा पाया साध्य व्हावा ॥३॥
तिसरा हा वर घ्यावा सत्य गुण । सदा तुझें ध्यान राहो देवा ॥४॥
चवथा हा वर नीति धर्म घडो । मस्तक हा पड़ो संताचरणीं ॥५॥
पांचवा हा वर समदृष्टी राहो । सर्व घटी पाहो निजरुप ॥६॥
जैरामदास म्हणे प्रभु दिनानाथा । मागणें हें आतां तुम्हापाशी ॥७॥

## अभंग १९

आई बहिणींनो करावे साधन । नीति नियमाविण चालू नये ॥१॥
पहाटेस करा सडा-सारवण । प्रभुचे भजन करा तुम्ही ॥२॥
रांगोळी काढावी द्वारी वृंदावनी । पांडुरंगा ध्यानी आणुनिया ॥३॥
प्रपंच परमार्थ करावे हे सम । हाचि नीति धर्म चालवावा ॥४॥
ऐसिया नियमे चालेल जी बाई । पुन्हा येणें नाही गर्भवासा ॥५॥
बाई तुम्ही ठेवा जनीं प्रेमभाव । विठ्ठल केशव मनी घ्यावा ॥६॥
जैरामदास म्हणें ऐका आईबहिणी । वागा विचारांनी प्रपंचांत ॥७॥

## अभंग २०

ऐका कर्कशेचे लक्षण । सदा निंदेमाजी ध्यान ॥१॥
निंदा करी दुसऱ्याची । वाडवडील सासऱ्याची ॥२॥
जैसे राही जिचे मन । तैसे पाही सर्वजन ॥३॥
संत बघती समदृष्टी । कपटी रुपांत कपटी ॥४॥
जैराम म्हणे आई बहिणी । ऐसी देवाची गाऱ्हाणी ॥५॥

## अभंग २१

निष्कपट निसंग निर्मळपणें । प्रभुचें चिंतन करीत जावे ॥१॥
करावें भजन पाळावे ते नेम । साह्य नारायण होईल तुम्हा ॥२॥
सर्व जीवावरी ठेवावी ती दया । कृपा होईल तया सद्‌गुरुची ॥३॥
म्हणे जैरामदास ऐका हो सज्जना । यमाचे बंधना तोडावया ॥४॥

## अभंग २२

ऐका पतिव्रतेचे गुण । राही पतीचरणी ध्यान ॥१॥
प्रपंच परमार्थ करी सम । पति सेवेत ती मग्न ॥२॥
जगीं बोले ती प्रेमाने । अंतर आत्मा निर्मळपणें ॥३॥
दया धर्म शांती जवळीं । देव तिजला सांभाळी ॥४॥
साधू संत घरा येती । त्यांचे दर्शन करी ती ॥५॥
प्रेमरूपी करी सेवा । धन्य भाग्य माझे देवा ॥६॥
भोजन करूनी तयार । जेवा म्हणें पोटभर ॥७॥
दु:खी जिवाची तळमळ । पाहून नेत्रा येई जळ ॥८॥
ऐसा पतिव्रतेचा नेम । सदा जपे रामनाम ॥९॥
जैराम म्हणे हीं लक्षणें । तिसी त्रिलोकी नाही उणें ॥१०॥

## अभंग २३

जयाचा विश्वास देवावरि नाही । जन्मा येऊन जाई अधोगती ॥१॥
ज्याचा नाही कधी भाव देवावरि । फिरेल तो फेरी चौऱ्याशिची ॥२॥
रात्रंदिवस त्याचे निंदेवरि ध्यान । सन्मार्ग सोडून निंदाकरी ॥३॥
याच नियमांनी वागेल जो प्राणी । चौऱ्याशीची खाणी पुढे आहे ॥४॥
जैरामदास म्हणे निंदा करूं नये । पुढे दु:ख होय आईबापा ॥५॥

## अभंग २४

किती़क लोकांची ऐसी आहे रीत । बोला करी हित बायकोच्या ॥१॥
लग्न झाल्यावरी पत्नी आली घरी । काम नाही करी कवडीचे ॥२॥
आईबाप यांचा न ठेवी तो मान । वागतो प्रेमानं सासऱ्याशी ॥३॥
लहानाचा मोठा केले त्या पालन । गेला तो भुलून आईबापा ॥४॥
आईबाप यांना भुलुनिया गेला । कैसा पुत्र झाला पहा तुम्हीं ॥५॥
ऐसी आहे बापा यांची खोटी रीत । सोडियेली रीत रांडे पायी ॥६॥
जैरामदास म्हणे खोटा मार्ग सोडा । सेवेंत मन जोडा आईबापांच्या ॥७॥

## अभंग २५

हृदयी रामराम ध्यावे हो सज्जन । गुरुचरणीं ध्यान नित्य नेमें ॥१॥
हेचि साधन करतां गेला कांही काळ । झाले हो निर्मळ मन त्याचे ॥२॥
राग द्वेष सर्व अहंकार मिटले । मन ते लागले गुरुचरणी ॥३॥
गुरुमुर्ति पाहतां डोळे बिबावले । ध्यान ते लागले पांडूरंगी ॥४॥
जो कोणी करील ऐसे हे साधन । तोचि पुण्यवान जैराम म्हणे ॥५॥

## अभंग २६

देवा चरणी अर्पून मन । नित्य करावे भजन ॥१॥
अहंभावाशी त्यागावे । त्याने भक्तिमार्ग ध्यावे ॥२॥
सर्व जीवावरि समदृष्टी । साह्य होई जगजेठी ॥३॥
दया क्षमा आणि शांती । मनी असावी वसती ॥४॥
जैराम म्हणे सत्व गुणा । आचरावे हो सज्जना ॥५॥

## अभंग २७

पति आज्ञा मान्य न करी जी बाई । दुःख तिला होई सदोदीत ॥१॥
मनी राग द्वेष नित्य ठेवीतसे । पुण्य तिचे नासे क्षणोक्षणी ॥२॥

कपटी मनाने करी तो भाषण । कुमार्गात ध्यान ठेवी सदा ॥३॥
पतिवरि प्रेम वरपांगी ठेवी । पर पुरुषी राही मन तिचे ॥४॥
सासू नि सासरा, दीर नि भासरा । द्वेषभावें सर्वां वर्ततसे ॥५॥
सत्याचा असत्य करीत व्यवहार । आपणांस थोर म्हणवीतसे ॥६॥
ऐसिया रीतीने वागते जी बाई । नर्कवास होई जैराम म्हणें ॥७॥

## अभंग २८

आईबापा तुम्ही जरा द्यावे ध्यान । धर्माचे पालन करा तुम्ही ॥१॥
मुलीचा पैसा घेऊ नये कोणी । लिहिले पुराणी वेदामधे ॥२॥
कन्येशी विकी जो धर्म त्याचा गेला । नरकी पडला रौरौवांत ॥३॥
मुलीशी विकूनि धर्म विसरला । कुमार्गी लागला तोचि एक ॥४॥
मुलीचा विकरा करील जो नर । होई दु:ख फार याच जन्मी ॥५॥
घरी गेल्यावरि सर्व छेडतील । दु:ख ते देतील नित्यबोल ॥६॥
तुझ्या वडिलांनी आम्हा विक्री केला । सांगितो तुजला ऐक आता॥७॥
घरी नाही अन्न गेले सर्व धन । आण कमावून कोठूनिया ॥८॥
ऐकोनिया गोष्टी रडे धडधडा । धन्य गा बापुड्या बापा माझ्या ॥९॥
ऐकोनिया गोष्टी बापा देई शाप । केले महापाप आईबापा ॥१०॥
जोंवरि हा आतमा दु:खांत राहील । दोष तो लागेल सर्व तुम्हा ॥११॥
पुत्रासाठी फार धन कमाविल्या । मान ती कापल्या जन्म देऊनी ॥१२॥
ऐसे नानापरी देत असे शॉंप । भोगाल महापाप आईबापा ॥१३॥
जैरामदास म्हणे आतातरी जागा । नका तुम्ही वागा कुमार्गाने॥१४॥

## अभंग २९

सत्य माझा भाव सत्य माझा देव । सदा संगे सत्य माझा ॥१॥
सत्यरुपी राखा बंधनरुपी धागा । सांगितों मी सत्य बोला ॥२॥

सत्य स्वरुपाची करा ओळखण । करावे त्याग दुर्व्यसनाचा ॥३॥
जैरामदास म्हणे सत्य नेम धरा । चुकावया फेरा चौऱ्याशीचा ॥४॥

## अभंग ३०

मुर्खासारखा जो वागणूक करी । अहंभाव धरी सदोदित ॥१॥
येऊनी संसारी हिताशी मुकला । जन्म वाया गेला सर्व त्याचा ॥२॥
मी तू पणा पायी भूलोनी देवाला । निमग्न तो झाला धन द्रव्यांत ॥३॥
कवडीकवडी जोडूनिया धन । नाही केले दान कधी त्याने ॥४॥
काळोबानी त्यास अंतकाळी नेंले । धन ते जोडिले जनालागी ॥५॥
क्षणोक्षणी असे विचार करावे । कीर्ति ठेवूनि जावे जैराम म्हणे ॥६॥

## अभंग ३१

संसारी येऊनि भ्रांतीत पडले । हित बुडविले माये पायी ॥१॥
पुण्याच्या प्रतापे आला इहलोकीं । नाही केली ओळखी विठ्ठलाची॥२॥
मी तूं पणामाजी मग्न मग राही । पाहे सर्व ठायीं माझे तुझे ॥३॥
अतकाळी नाम मुखी येत नाही । म्हणुनि जन्म घेई वेळोवेळी ॥४॥
जैरामदास म्हणे विसरू नका नाम । मिळेल विश्राम आईबापा ॥५॥

## अभंग ३२

पतिच्या वचना खंडण जी करी । मिळे निरंतरी नर्कद्वार ॥१॥
वाड वडिलांचा नाही ठेवी मान । दावी मी तूं पण जनलोकी ॥२॥
रागद्वेष ठेवुनि पतीस बापाही । तिला सुख नाही तीळभर ॥३॥
प्रेमभाव गुण अंगी जिचे नाही । कर्कशा जगी ही व्यर्थ आली ॥४॥
कधी न भजत मुखी रामनाम । वेळोवेळी काम आठवीत ॥५॥
जैरामदास म्हणे ऐसिया बाईचे । दर्शनाने पुण्य क्षीण होते ॥६॥

## अभंग ३३

तुझ्या भेटीविण जीणें व्यर्थ देवा । सुख नाही जीवा तुजवीण ॥१॥
तूं माझा चालक मी तुझा बालक । आता सहायक होई मज ॥२॥
तुजविण शोभा कोण्या ठायी नाही । आहे सर्व देहीं वास तुझा ॥३॥
काळोख अंधार दिसे मला जगीं । मायेचिया भोगीं भुललों देवा ॥४॥
मन हें उदास राहतें अहर्निशी । केव्हां भेट देशी पांडुरंगा ॥५॥
तुजविण रोगी आहे मी संसारीं । वैद्य गा श्रीहरी येई त्वरे ॥६॥
येऊनिया मज द्यावी ती औषधी । रोग न लागो कधी मायेचा हा ॥७॥
जैरामदास म्हणे प्रार्थना ही तुला । जन्मोजन्मी मला तुझा संग ॥८॥

## अभंग ३४

आठविला नाही राम ज्याने मनीं । दुःखी जन्मोजन्मी होत असे ॥१॥
संगतीच्या पायीं विसरूनी देवाला । नेम तो धरला कुसंगाचा ॥२॥
बुद्धीचा पालट तात्काळची झाला । अहंभाव समावला मनीं त्याच्या ३
गर्वाच्या नादांत अहर्निशी राही । माझे माझे पाही सर्वठायी ॥४॥
हिताशी नाडला जन्मवाया गेला । फेऱ्यांत पडला चौऱ्याशीच्या ॥५॥
येऊनिया जगीं आला तैसा गेला । उरूनीं न मेला कीर्तिरुपें ॥६॥
नाम विसरल्याने फळ मिळे ऐसे । जैराम म्हणतसे नाम जपा ॥७॥

## अभंग ३५

धरु नका संगत कपटी मानवाची । गुण अंगी येई सर्व त्याचे ॥१॥
सदोदीत ध्यान ज्याचे निंदेवरी । नित्य निरंतरी मग्न राही ॥२॥
आपणासारिखे पाहे तो सर्वास । मानी आपणांस बुद्धीवंत ॥३॥
जैसे ज्याचें मन तैसें त्याचें कर्म । शुद्ध होता मन सर्व साधे ॥४॥
जैरामदास म्हणे खोटया संगती त्यागा । सत्य मार्गा लागा तरावया ।५।

## अभंग ३६

द्वेशभाव ज्याचा सर्वनाश झाला। उणे नाही त्याला त्रैलोक्यांत ॥१॥
राहुनी प्रपंची परमार्थ साधिला। कीर्ति ठेवुनी गेला इहलोकीं ॥२॥
धन्य तो पुतळा जन्मासी येऊनी। आपण तरूनी दुज्या तारी ॥३॥
सुखी केलें त्याने सर्वहि जीवांस। मुक्त बंधनास केलें त्याने ॥४॥
ऐसे ज्याचे अंगी असती हे गुण। करिती वंदन सर्वलोक ॥५॥
जैरामदास म्हणे धन्य तो जिव्हाळा। बुडत्या जनांला तारावया ॥६॥

## अभंग ३७

मन लागो तुझ्या ध्यानीं। आणिक वस्तु नये मनीं ॥१॥
तुझ्या रंगांत मी दंग। दिसो सर्वत्र पांडुरंग ॥२॥
तुझा नित्य लागो ध्यास। कुमतीचा होवो नाश ॥३॥
तुझ्या भक्तींत न पडो भंग। हेची मागणें अखंड ॥४॥
ऐसे गुण देगा श्रीहरी। विनवणी जैराम करी ॥५॥

## अभंग ३८

संकल्प विकल्प त्याग न जो करी। त्यासी साह्य हरी सदोदीत। १॥
दृढ़भाव धरी हृदय मंदिरीं। त्याचा तो कैवारी दिनानाथ ॥२॥
रात्रदिवस ध्यान भक्तीमधे मग्न। तयाशीं दर्शन देतो हरी ॥३॥
सर्वस्व अर्पण देवा ज्याने केला। भाग्याचा पुतळा तोच जगीं ॥४॥
जैरामदास म्हणे देव मिळवून घ्यावा। तेणें सुख जीवा होय बापा ॥५॥

## अभंग ३९

मूळचे स्वरुप विसरूनी गेला। भ्रांतींत भूलला मायेमध्ये ॥१॥
संसारीं येऊनी मीपणीं थाटला। कर्म विसरला सत्मार्गाचे ॥२॥
अज्ञानतेच्या पायी आडमार्गी जाई। म्हणूनी दुःख होई जन्मोजन्मी।३।

विसरुनी देवाशी फिरे चहूंदिशी । आयुष्याची माती करीतसे ।।४।
धनःद्रव्य जोडून जनासाठी ठेविला । हिताशीं नाडला आपुलिया ।।५।
म्हणूनिया जन्म घ्यावे त्यासीं लागे । जन्मोजन्मी भोगे दुःख फेरा ।।६।।
सन्मार्ग धरुनी कुमार्गा त्यागावे । स्वरुपी मिळावे जैराम म्हणे ।।७।।

## अभंग ४०

जन्म बहु झाले वासनेच्या पायीं । भेट झाली नाही प्रभुजीची ।।१।।
माया मोहनी संसार या वनीं । चौऱ्याशी बंधनी फिरवितसे ।।२।।
मूळच्या स्वरुपीं विसर पाडून । ठेवी आनंदाने संसारांत ।।३।।
ऐसी कळा तिची नकळे सर्वांना । शोधूनिया मना पहा तुम्ही ।।४।।
जैरामदास म्हणे प्रपंच करोनी । मुक्त झाले जनीं साधुसंत ।।५।।

## अभंग ४१

काळाचें भोजन आयुष्याशी खाणें । नित्य तें राहणें लोभासवें ।।१।।
दुर्व्यसन व्यवहार ज्या देहीं प्रकटला । काळ तो शिरला याच देहीं ।२।
ज्याच्या ह्या हृदयीं काळ वास करे । तयाशीं ना कळे सत्य मार्ग ।।३।।
खोटयानाटया गोष्टींत प्रेमभावे राही । सर्व लोकां पाही द्वेष भावें ।४।
चहूदिशा बघा हाचि आहे उभा । पदोपदी धोका आहे याचा ।।५।।
प्रभुचिये चरणीं दृढ़भाव धरा । चुकवाया मारा काळाचिया ।।६।।
जैराम म्हणे हित साधा वेळी । नाहीतरी पाळी चौऱ्याशिची ।।७।।

## अभंग ४२

गुण ऐसा देगा देवा । घडो जन्मोजन्मी सेवा ।।१।।
गुण ऐसा देगा देवा । मनी तुझा ध्यास रहावा ।।२।।
गुण ऐसा देगा देवा । मी तू पण विसरवावा ।।३।।
गुण ऐसा देगा देवा । प्रपंच करूनी परमार्थ व्हावा ।।४।।

गुण ऐसा देगा देवा । मन राहो तुझ्या सवा ॥५॥
गुण ऐसा देगा देवा । नित्य तुझा संग व्हावा ॥६॥
गुण ऐसा देगा देवा । सुख मिळो सर्व जीवा ॥७॥
दास जैरामाची विनवणी । कानी घ्यावे चक्रपाणी ॥८॥

## ओवी १

आई माझे बहिणींनो करावें साधन ।
चालूं नये नेमाविण, रामकृष्ण गोविंद ॥१॥
पहाटेस उठून करा सडासारवण ।
आंघोळ करून शिजवा अन्न, रामकृष्ण गोविंद ॥२॥
अंगणीं आणि तुळशीपासी भरा रांगोळी ।
साह्य होईल वनमाळी, रामकृष्ण गोविंद ॥३॥
कुंकूं लावा कपाळीं स्वामी असूं द्या भाळीं ।
साह्य होईल चंद्रमौळी, रामकृष्ण गोविंद ॥४॥
तुळशी करा पूजन नमन करा पतीशी ।
लागा प्रपंच परमार्थाशी, रामकृष्ण गोविंद ॥५॥
जैरामदास सांगतसे सर्व आई बहिणीला ।
विसरू नका या नियमाला, रामकृष्ण गोविंद ॥६॥

## ओवी २

भोगणें पडतें दुःख आलीया जन्माशीं ।
दैव कर्म फळ नाही चुकती गा कोणाशी ॥१॥
पूर्वी जैसें कर्म केलें तैशी झाली त्याची मति ।
भोगणे पडली विपत्ति जैशी मिळाली संगती ॥२॥

राजा रंग फकीर आणिक संन्याशी ।
प्रारब्ध गति हरिश्चंद्र, आणिक पांडवांशी ॥३॥
कर्म गति सर्वाला भोगणें लागेल ।
जैरामदास सांगे बोल केलें तसें पावेल ॥४॥

## ओवी ३

मानवाचे नियम ऐका हो सज्जन ।
विचार करा क्षणोक्षण, रामकृष्ण गोविंद ॥१॥
पहिलें साधन अहंकाराशी मारा ।
चित्त स्थीर होईल खरा, रामकृष्ण गोविंद ॥२॥
दुसरें हें साधन धर्म-नीति जाणा ।
सर्व जीवांशी एक माना, रामकृष्ण गोविंद ॥३॥
तिसरें हें साधन आहार निद्रा मैथून जाणा ।
यांशी करा दंडण, रामकृष्ण गोविंद ॥४॥
चवथें हें साधन द्वेषभाव त्यागाना ।
हरीचरणी मन जोडाना, रामकृष्ण गोविंद ॥५॥
पांचवें साधन बैसावें आसनीं ।
तेव्हा उमटेल सत्यध्वनी, रामकृष्ण गोविंद ॥६॥
या नियमांनी चालेल ऐसे म्हणे जैराम ।
सफल होईल त्याचा जन्म, रामकृष्ण गोविंद ॥७॥

समाप्त